# वसुंधरा महाविद्यालयात सायबर सुरक्षेवर जनजागृती कार्यक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

सोलापूर, ता. २६ : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणक शास्त्र संकुल, क्वीक हिल फाउंडेशन आणि वसुंधरा कला महाविद्यालयात सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. तानाजी देशमुख होते.

यावेळी संगणक शास्त्र संकुलातील राहुल शिंदे व मोहिनी दुधाळ यांनी सांगितले की, फसवणूक होऊ नये म्हणून त्याबद्दल खात्री करूनच त्यावर विश्वास ठेवावा. त्यासाठी ओटीपी कोणास सांगू नये, अनोळखी नंबर वरून आलेले फोन कॉल्सची पडताळणी करावी. व्हाट्सअप व इतर सोशल मीडियावर आलेल्या मेसेजेस व लिंकची शहानिशा करूनच पुढील प्रक्रिया



करावी. पासवर्ड स्ट्रॉंग वापरून स्वतःची माहिती सुरक्षित करावी. त्यासाठी मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉप आदी साधनांवर अधिकृत अँटीव्हायरसचा वापर करावा.

या कार्यक्रमासाठी एकूण १५० विद्यार्थी उपस्थित होते. अध्यक्षीय आढाव्यात महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. तानाजी देशमुख यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अनुराधा क्षीरसागर, प्रा. मुल्ला ए. ए., प्रा. आसमा शेख, प्रा. मेघा ढाणके यांनी सहकार्य केले. योगेश शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. सायली उबाळे यांनी आभार मानले.